# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2019-20/3449

दिनांक 21 NOV 2019

प्रति,

प्राचार्य /संचालक,

सर्व शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था ,

नागपूर विभाग. नागपूर

**विषय:- तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांमार्फत महा-डीबीटी पोर्टलवरील राबविण्यांत येत असलेल्या योजनांकरिता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करण्यांबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल-2019/492/ दि.05/11/2019

आपले सरकार डी.बी.टी. पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनांच्या विविध योजनांचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्यापैकी खालील योजना, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येतात.

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

2) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

3) उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-1 वैद्यकीय अभ्यासक्रम वगळुन)

शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता साठी पोर्टलवर जाहीर केलेल्या वेळापत्रकांनुसार प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यांकरिता तसेच पात्र विद्यार्थी वरील योजनांच्या लाभापासुन वंचित राहू नये. याकरिता उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत आलेले होते. परंतु या विभागांतर्गत येत असलेल्या संस्थांच्या लॉगीन मध्ये सदर योजनांचे एकुण 13878 विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

आपल्या संस्थेतील प्रवेशित असलेले सदर शिष्यवृत्तीकरिता पात्र असलेले विद्यार्थ्यांने अजुनपर्यंत अर्ज सादर केलेला नाही. अशा विद्यार्थ्यांना आपल्या संस्थांस्तरावर सुचना देण्यांत यावे. जेणे करून लाभार्थी विद्यार्थी सदर योजनांपासुन वंचित राहणार नाही. अन्यथा अर्ज न भरण्याच्या कारणास्तव पात्र विद्यार्थी योजनेंच्या लाभापासून वंचित राहिल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील., यांची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. राम निबुदे)

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर